# “ग्रामीण महिला सशक्तीकरण” विषयावरील कार्यशाळा

केसीईई सोसायटी संचालित मूळजी जेठा महाविद्यालयात “ग्रामीण महिला सशक्तीकरण” या विषयावर कार्यशाळेचे आयोजन जलश्री वॉटरशेड सर्वेलंन्स अॅण्ड रिसर्च इन्स्टिटयूट, जळगाव संस्थाद्वारे आयोजित करण्यात आले होते. हा कार्यक्रम मूळजी जेठा महाविद्यालयच्या “कॉलेज ऑफ एक्सलन्स” या कार्यक्रमांतर्गत घेण्यात आला होता. या कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय कुलकर्णी यांच्या मनोगताने झाली,





त्यांनी पाणी हे जीवन आहे ते जपून वापरावे त्याची उपोयोगीता आणि त्यवर अवलंबून असणारी प्राणीसृष्टी याबद्दल मार्गदर्शन केले .त्यानंतर अनिल भोकरे, कृषी उपसंचालक, जळगाव यांनी बचत गटाच्या महिलांना कृषी आधारित उद्योगांची सविस्तर माहिती दिली. जलश्रीच्या संचालिका डॉ. स्वाती संवत्सर यांनी देशातील गावातील होतकरू महिलांच्या यशाबद्दल माहिती दिली. तसेच मिलिंद पंडित यांनी हायड्रोपोनिक बद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. यात जमिनीवाचून केवळ पाण्यात वनस्पती वाढवण्याची पद्धती सांगण्यात आली. जिल्ह्यातील गट प्रमुख महिला या कार्यक्रमात सहभागी झाल्या होतात. ५४ महिलांची या कार्यक्रमाला उपस्थिती लाभली होती. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. चेतन महाजन, समीर कुरेशी, गोपाल जोशी, संकेत कोरडे, नरेश गायकवाड व आबा धनगर यांनी परिश्रम घेतले.